# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. २१ ऑक्टोबर २०१९**

# शुक्रवारी होणार नव्या महापौर-उपमहापौरांची निवड

**नागपूर, ता. २१ :** नागपूर महानगरपालिकेच्या नव्या महापौर व उपमहापौर पदासाठी शुक्रवारी (ता. २२) निवडणूक विशेष सभा होईल. महाल येथील श्रीमंत राजे रघुजी भोसले नगर भवन येथे सकाळी ११ वाजतापासून निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होईल.

शुक्रवारी प्रारंभी पिठासीन अधिकाऱ्यांद्वारे नामनिर्देशपत्राची छाननी केली जाईल. यानंतर उमेदवारांना नामनिर्देशनपत्र मागे घेण्यास वेळ दिला जाईल. पिठासीन अधिकाऱ्यांद्वारे उमेदवारांची नावे घोषित झाल्यानंतर आवश्यक असल्यास मतदान घेण्यात येईल. यानंतर पिठासीन अधिकारी नवनिर्वाचित महापौर व उपमहापौर यांच्या नावांची घोषणा करतील.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने महापौर पदासाठी नगरसेवक तथा सत्तापक्ष नेता संदीप जोशी तर उपमहापौर पदासाठी नगरसेविका मनिषा कोठे यांनी नामांकन पत्र सादर केले आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या वतीने महापौर पदासाठी नगरसेविका हर्षला साबळे तर उपमहापौर पदासाठी राकाँ पक्षनेता तथा नगरसेवक दुनेश्वर पेठे यांनी

अर्ज दाखल केला आहे. बहुजन समाज पार्टीच्या वतीने महापौरपदाकरिता नगरसेवक मोहम्मद इब्राहिम तर उपमहापौरपदासाठी नगरसेविका मंगला लांजेवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.